अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की
माझे संपुर्ण नाव : अक्षय हनुमानदास वैष्णव,
वय सुमारे : ३१ वर्षे, व्यवसाय : व्यापार,
राहणार : डिग्गी बालाजी मंदीर, परभणी.

-------------------------------

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी वकील श्री. ए. एन. गिराम यांचे मार्फत :–**

१. मी बैरागी जातीचा आहे. आरोपी सुरज ढोके, किरण ढोके, गोपाल देशमुख यांना मी ओळखतो. आता ते कोर्ट रुममध्ये हजर आहेत. ते माझ्या घराच्या परिसरामध्ये राहत होते. आरोपी सुरज ढोके आणि किरण ढोके हे कासार जातीचे आहेत, गोपाल देशमुख हा मराठा जातीचा आहे. मला दोन भावजया नामे संगिता व तबस्सूम आहेत. संगिता ही महार जातीची आहे.

२. दि. १४/३/२०२० रोजी रात्री १२.१० वाजता डिग्गी बालाजी मंदीर परिसर, परभणी येथे घटना घडली. तेव्हा मी व माझे कुटुंबीय घरी बसलो होतो. त्यावेळी आरोपी क्र.१ ते ३ आमच्या घरासमोर आले. आरोपी गोपाळ देशमुख याने माझी भावजय संगिता हिला शिवीगाळ केली की तू महार जातीची आहेस, येथे राहायचे नाही. आरोपी सुरज ढोके व किरण ढोके देखील तसेच बोलत होते. ते तिघेही म्हणत होते की तुम्हाला मारुन टाकू. माझी वहिनी तबस्सूम भांडण सोडवण्यासाठी मध्ये आली. आरोपी गोपाळ याने तिचे हात धरुन तिला बाजूला सरकवले. त्यामुळे मी आरोपी गोपाळला बाजूला सरकवले. त्यानंतर तिघेही आरोपी माझ्या अंगावर धाउन आले. त्यांनी माझ्यासोबत झटापटी केली. आरोपी गोपाळ याने तलवारीने माझ्या डोक्यावर मारले. त्यामुळे मला डोक्याला जखम झाली व त्यातून रक्त निघाले. त्यामुळे मी बेशुध्द झालो. सिव्हील हॉस्पीटल, परभणी येथे मी शुध्दीवर आलो.

३. सिव्हील हॉस्पीटल, परभणी येथे उपचार घेत असताना पोलिसांनी माझा जबाब/फिर्याद नोंदवली. आता सदरचा जबाब/फिर्याद मला दाखवली. त्यावर माझी

सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२३** देण्यात आली.

४. या घटनेपूर्वी आरोपी सुरज ढोके याने माझ्या काका विरुध्द त्याच्या आईला छेडछाड केली म्हणून फौजदारी केस केली होती.

**आरोपी तर्फे उलटतपास श्री. एस. एस. देशमुख वकील यांचे मार्फत :–**

५. घटनेच्या वेळी मी दिल्ली येथे मिक्स मार्शल आर्ट शिक्षण घेत होतो. घटनेच्या वेळी दि. १/३/२०२० रोजी मी परभणी येथे आलो होतो. सदरचे शिक्षण हे खाजगी संस्थेद्वारे असल्यामुळे जेव्हा पाहिजे तेव्हा सुट्टी घेउन येता येत होते. आम्ही राहतो ते घर आमचे स्वतःचे आहे. डिग्गी बालाजी परिसरामध्ये आरोपी गोपाळ देखमुख त्याच्या परिवारासह राहतो. हे म्हणणे खरे आहे की आरोपी गोपाळ देशमुख राहतो ते घर आमच्या मालकीचे नाही. हे म्हणणे खरे आहे की गोपाळ देशमुख याचे घरापासून ५० मीटर अंतरावर एक पोलीस चौकी आहे. हे म्हणणे खरे आहे की तेथे २४ तास पोलीस बंदोबस्त असतो. हे म्हणणे खरे आहे की डिग्गी बालाजी मंदीर परिसरात भाजी बाजार आहे. हे म्हणणे खरे नाही की सदर परिसरात रात्री १२.०० वाजता देखील लोकांची ये जा चालू असते.

६. डिग्गी बालाजी मंदिरापासून माझे घर ५० फुट अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की डिग्गी बालाजी मंदिराच्या विश्वस्त मंडळाबाबत आरोपी सुरज ढोके याने धर्मादाय आयुक्त यांच्याकडे तक्रारी दिलेल्या आहेत. माझे वडील सदर विश्वस्त मंडळामध्ये विश्वस्त आहेत. हे म्हणणे खरे आहे की आरोपी सुरज ढोके याने माझे वडील व इतर विश्वस्त यांच्या विरुध्द गैरकारभार केल्याबाबत आरोप केले होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या काका विरुध्द आरोपी सुरज ढोके याने केस केली होती या रागामुळे रविकिरण यांच्या पत्नीने आरोपी सुरज व किरण यांच्या विरुध्द विनयभंग केल्याबाबतची केस केली होती.

७. फिर्याद माझ्या हस्ताक्षरामध्ये नाही. फिर्यादमधील मजकूर माझ्या सांगण्यानुसार लिहिलेला आहे. माझे फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग–अ आता मला वाचून दाखवला. तो मजकूर चुकीचा आहे. माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग–ब

वाचून दाखवला. तो बरोबर आहे. सुरज ढोके याच्या आईने दाखल केलेल्या फिर्यादवरुन फौजदारी केस प्रलंबीत आहे.

८. मी दि. १४/३/२०२० रोजी फिर्याद दिली. पोलीस दवाखान्यामध्ये माझेकडे आले होते तेव्हा त्यांनी माझी तक्रार घेतली. हे म्हणणे खरे आहे की आरोपी गोपाळ देखमुख हा आरोपी सुरज ढोके याचा मित्र आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपी गोपाळ देखमुख डिग्गी बालाजी मंदीर परिसरात राहतो म्हणून त्याच्याविरुध्द आमचा राग आहे. हे म्हणणे खरे नाही की आरोपीच्या आईने माझे काकाविरुध्द केलेली केस परत घ्यावी म्हणून आम्ही आरोपीला विचारणा करत होतो. आम्ही भाउ वेगवेगळे राहतो. मी ज्या घरामध्ये राहतो तेथे माझ्यासोबत माझे आई, वडील, भाउ पियुष राहतात. हे म्हणणे खरे नाही की माझी भावजय संगिता व तबस्सूम यांना आरोपी ओळखत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे सांगितले की आरोपीने माझ्या भावजयला जातीवाचक शिवीगाळ केली, हात धरला व माझ्या डोक्यावर तलवारीने वार केला. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घराच्या दरवाजाची चौकट डोक्याला लागल्यामुळे मला जखम झाली होती. हे म्हणणे खरे नाही की आरोपीने माझ्या वडीलांविरुध्द धर्मादाय आयुक्त यांच्याकडे केलेल्या तक्रारी परत घ्याव्या म्हणून त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी ही खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की खोटी साक्ष दिली.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष,

दिनांक – १३/७/२०२६

**( एन. पी. त्रिभुवन )**
अति. सत्र न्यायाधीश–१, परभणी.